## प्रस्तावना

भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या प्रगतीचा अभ्यास करणे गरजेचे आहे कारण स्वातंत्र प्राप्तीनंतर या संस्थानी, सामाजिक स्वतंत्र सत्ताचे विकेन्द्रीकरण, नियोजन, विकासाच्या क्षेत्र खूप मोठी प्रगती केली आहे.

नगरपालिका प्रशासन हा यांचाच एक महत्वाचा भाग आणि पाया म्हणून ओळखला जातो, स्थानिक नेतृत्वाचे प्रशिक्षण केन्द्र व लोकशाही विकास प्रक्रीयेचे मुळ म्हणून या संस्थेकडे पाहिले जाते. विकासासंबंधीच्या महत्वाच्या गोष्टी स्थानिक नेत्याना पुरवील्या जातात आणि त्यातूनच त्यांना स्वत:ला निर्णय घ्यावयाचे असतात. आणि म्हणून नगरपालिका प्रशासनाचा अभ्यास करण्याची प्रबळ इच्छा आणि या प्रबळ इच्छातूनच इचलकरंजी नगरपालिकेची स्थापना आणि विकास कसा होत गेला याविषयीचा अभ्यास केला गेला.

सन १९९३ मध्ये इचलकरंजी नगरपालिकास शंभर वर्षे पूर्ण केलेले आहेत. इचलकरंजी नगरपालिकेची स्थापना १८९३ मध्ये झाली होती. सन १८९३ ते १९९३ या १०० वर्षांच्या कालावधीतील नगरपालिका विकासाचा अभ्यास करणे ही महत्वाचे होते. हा अभ्यास प्रामुख्याने दोन गोष्टीवर म्हणजे ऐतिहासिक पध्दती व एकंदरीत अस्तित्वात असणाऱ्या तारखा, घटना, आंकडेवारी ही खालील साधनावरुन घेतल्या आहेत.

१) प्रकाशित ग्रंथालयातील साधने.

२) अप्रकाशित इचलकरंजी नगरपालिकेकडील रेकॉर्ड.

प्रकाशित साधनाच्या मध्ये प्रामुख्याने वार्षिक प्रशासकीय अहवाल नगरपालिका स्थायी समिती इतिवृत्तांत आणि उपयोगी साहित्य त्याच बरोबर प्रकरणाला अनुसरुन असणारी पुस्तके तसेच वृत्तपत्रे याचाही अभ्यास केला आहे.

अप्रकाशित मध्ये इचलकरंजी नगरपालिकेने ठेवलेले रेकॉर्ड उदा. जन्म-मृत्यु नोंद, रजिस्टर, घरपट्टी मूल्यांकण रजिस्टर, घरपट्टी पूर्णमूल्यांकण रजिस्टर, घरपट्टी मागणी रजिस्टर, पोच पावती पुस्तक, नगरपालिका शिक्षण मंडळ रेकॉर्ड,

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR
BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

नगरपालिका दवाखाना ,दप्तर मार्केट डिमांड रजिस्टर ,तपासणी अहवाल, ऑडिट रिपोर्ट इत्यादि.

मुळ आणि दुय्यम साधनाचा अभ्यास करुन या मधील अंकाचे तक्ते व माहिती तयार केली आहे व त्याचा वापर यामध्ये केला आहे.तसेच नगरपालिकेने निरनिराळ्या खात्याशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या आधारे तयार केलेल्या माहितीचा ही यामध्ये उपयोग केला आहे.

हा प्रबंध प्रामुख्याने सात विभागात ( प्रकरणात ) विभागला आहे --

पहिल्या प्रकरणामध्ये प्रस्तावना व इचलकरंजी शहराचा ऐतिहासिक आढावा घेणेत आला आहे,यामध्ये प्रामुख्याने इचलकरंजी संस्थानाचा थोडक्यात इतिहास व इचलकरंजी नगरपालिकेच्या स्थापना होण्यापूर्वीची स्थिती सन १८९३ पर्यन्तचा आढावा घेतला आहे.

दुसऱ्या प्रकरणामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासाचे टप्पे इंग्रजी अंमदानीत कसे विकसित पावले याविषयीची सुरुवातीला माहिती लिहिली आहे. त्यानंतर इचलकरंजी नगरपालिका स्थापना व विकासाच्या टप्प्यांचा आढावा घेतला आहे.

तिसरे प्रकरण हे नगरपालिका प्रशासनाशी संबंधित आहे.नगरपालिका नोकराच्या सेवाशर्ती आणि नगरपालिका प्रशासनाचे संपूर्ण चित्र रेखाटले आहे.

चौथे प्रकरण सन १८९३-१९९३ या कालातील नगरपालिका उत्पन्न व खर्चाशी संबंधित आहे.

इचलकरंजी नगरपालिकेने केलेल्या शैक्षणिक कार्याचा वृत्तांत आहे.

पाचव्या प्रकरणामध्ये तर साहावे प्रकरण नगरपालिकेने पुरविलेल्या सार्वजनिक अरोग्य सुविधा व शहर सफाईशी संबंधित आहे.

शेवटी उपसंहार व कांही सूचना मांडल्या आहेत.

प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी संदर्भ दिलेले आहेत व शेवटी संदर्भ ग्रंथ सूची जोडली आहे.

दिनांक :    :    :१९९४ .                आ.ता.साळोखे.

## आभार

इचलकरंजी नगरपालिकेचा इतिहास लिहिण्याची प्रेरणा माझे गुरुवर्य व मार्गदर्शक डॉ.बी.डी.खणे यांनी दिली. प्रबन्ध पूर्ण करणेसाठी आपला अमुल्य वेळ देऊन बहुमोल मार्गदर्शन केले.तसेच इतिहास विभागाचे पितामह म्हणून ओळखले जाणारे डॉ.बी.आर.कांबळे, यांनी माझ्यावर पुत्रवत प्रेम करुन माझ्या अडचणी समजावून घेऊन सहकार्य केले,तसेच इतिहास विभागाचे प्रमुख डॉ.व्ही.एस. कदम यांनी मला प्रेरणा दिली,तसेच इतिहास विभागातील इतर सर्व प्राध्यापकांनी मला प्रेम दिले त्याबद्दल मी सर्वांचा अत्यंत ऋणी आहे.

संशोधन करुन शोध-प्रबन्ध लिहिण्यासाठी मला संधी देणारे तत्कालिन मुख्यकार्यकारी अधिकारी मा.विजयकुमार सो तत्कालिन एस.एस.सी. बोर्डाचे व आजचे शिक्षण उपसंचालक ,कोल्हापूर विभागाचे मा.नानासाहेब माने सो तसेच तत्कालिन शिक्षण उपसंचालक मराठे साहेब,उपमुख्य कार्यकारी अधिकारी नानासाहेब मोसले सो ,शिक्षणाधिकारी एस.के.जाधव तसेच थोरात साहेब, उपशिक्षणाधिकारी मा.शेटे साहेब ,गटशिक्षणाधिकारी एन.जे. साळोखे व एस.जे.पोवार सो,तसेच इतर अधिकारी वर्ग जिल्हा परिषद शिक्षण विभागाचे कुलकर्णी व जे.एस.पाटील आणि त्यांचे सहकारी वर्ग पंचायत समिती हातकणंगले व गगनबावडा येथील कर्मचारी वर्ग या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे.

तसेच आपल्या अनुभवाची शिदोरी मला देणारे मा.सदाशिवराव मुरंदे काका,अशोकराव आरगे नगराध्यक्ष व नगरपालिका सदस्य मंडळ तसेच मा.आवाडे साहेब ,मा.आमदार आशोकराव जांभळे,मा.आ.जयंवतराव आवळे - सो, मा.आ.के.एल.मलाबादे. मा.आ.रत्नाप्पा कुंभार, पंडित काका,ल.क. कुलकर्णी आणि इतर ज्ञात-अज्ञात मंडळींचा मी अत्यंत ऋणी आहे.

या शोध-प्रबंधासाठी इचलकरंजी नगरपालिका रेकॉर्ड उपलब्ध करुन देणारे मुख्याधिकारी माळी सो,प्रशासन अधिकारी, हरसाले,मोरे ,जावीर,

लेबर ऑफिसर पाटील तसेच रेकॉर्ड खात्याचे प्रमुख जाधवसाहेब आणि इतर खात्याचे खातेप्रमुख व इतर कर्मचारी वर्ग तसेच मोडी रेकॉर्ड मराठीत भाषांतर करुन देणारे आण्णा सोळंके यांचा मी अत्यंत आभारी आहे.

हा प्रबंध पूर्ण होणेसाठी मा.श्री.बा.दा.पाटील,संचालक दि प्राथमिक शिक्षक सहकारी बॅन्क ,कोल्हापूर यांच्या पुढाकाराने शिक्षक बॅन्के मार्फत अर्थपुरवठा केला, तसेच आमच्या कन्या वि.मं.कबनूर शाळेचे मुख्याध्यापक ग.बा. गोरे आणि माझे सहकारी अध्यापक वर्ग व माझे मित्र श्री.ना.बा.देशमुख व मा.पां.कदम (बाण ) यांनी मला प्रेरणा दिली त्याबद्दल मी या सर्वांचा आभारी आहे.

तसेच दै.मॅचेस्टर ,दै.किसान,दै.पुढारी व दै.सकाळ,तसेच आपटे वाचन मंदिर, यांनी यातील लेख याची मला माहिती पुरविली त्याबद्दल ही मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

शेवटी माझा हा शोध-प्रबन्ध आईवडिलाच्या आर्शिवादाने व अर्धांगी सौ.कुसुम हिच्या सहकार्याने पूर्ण झाला याबद्दल त्यांनी मी धन्यवाद देतो.

कोल्हापूर -                                                    आ.ता.साळोखे,

दिनांक  :    :   :१९९४.

SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR